Registered No. B. 1.

THE

# Bombay Government Gazette.

Published by Authority.

THURSDAY, 12TH AUGUST 1897.

*Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

## PART IX.—Marathi Acts, &c.

### सन १८७० चा कोर्टाचे फीचा आक्ट आणखी सुधारण्यासाठीं आक्टाचा मसुदा.

ज्या अर्थीं सन १८७० चा कोर्टाचे फीचा आक्ट आणखी सुधारणें योग्य आहे; त्या अर्थीं यावरून खालीं लिहिल्याप्रमाणें ठरविण्यांत येत आहे :—

लहान सरनामा व सुरवात.

१. (१) या आक्टास सन १८९७ चा कोर्टाचे फीचा (सन १८७० चा) आक्ट सुधारण्याबाबद आक्ट असें ह्मणावें; आणि

(२) तो एकदम अमलांत येईल.

सन १८७० च्या ७ व्या आक्टाचें कलम १९ग याच्या नंतर दोन नवीन कलमें दाखल करणें.

२. सन १८७० च्या कोर्टाचे फीच्या आक्टाचें कलम १९ ग याच्या नंतर पुढील कलमें दाखल करावीं, ह्मणजे :—

मुख्य मुलकी अमलदारास कागदपत्र तपासण्याचा व इस्टेटाची किंमत कमी लावली आहे असें शाबीत करण्याचा अधिकार.

"१९ ह. (१) जिल्ह्याचा मुख्य मुलकी अमलदार हा कोणत्याही वेळीं, त्याच्या जिल्ह्यांतील एकाद्या कोर्टास ज्या कोणत्याही प्रकरणांत प्रोबेट किंवा वहिवाट चालविण्याची सनद मिळण्याविषयीं अर्जी केलेली असेल त्या प्रकरणांतील कागदपत्र तपासण्यास किंवा तपासविण्यास मुखत्यार आहे, आणि जर, अशा तपासानंतर किंवा इतर प्रकारें, त्यास असें वाटेल कीं अर्जदारानें मयताच्या इस्टेटाची किंमत कमी आकारली आहे तर, ज्या कोर्टापुढें सदर्हू अर्जीचें काम चालू असेल त्या कोर्टास त्या इस्टेटाच्या खऱ्या किंमतीबद्दल चौकशी करण्याविषयीं फर्माविण्याचा त्यास अखत्यार आहे.

(२) प्रत्येक कोर्टानें, वर सांगितल्याप्रमाणें त्यास फर्माविण्यांत आलें ह्मणजे, त्याप्रमाणें चौकशी केली पाहिजे आणि मयताच्या इस्टेटाची जवळ जवळ खरी किंमत किती आकारली पाहिजे होती त्यासंबंधानें ठराव लिहून ठेविला पाहिजे.

(३) अशा कोणत्याही चौकशीच्या कारणासाठीं कोर्टास, प्रोबेट किंवा वहिवाट चालविण्याची सनद मिळण्याविषयीं अर्जी करणाराची (जातीनें किंवा कमिशनच्या द्वारें) शपथेवर जबानी घेण्याचा, आणि इस्टेटाची खरी किंमत शाबीत करण्यासाठीं अशा मुलकी अमलदाराकडून किंवा अशा अर्जी करणाराकडून जो जास्ती पुरावा त्या कोर्टापुढें हजर करण्यांत येईल तो पुरावा घेण्याचा अखत्यार आहे".

प्रोबेट किंवा वहिवाट चालविण्याच्या सनदा यांवर कोर्टाची फी वसूल करण्याची रीति.

"१९ जे. (१) प्रोबेट किंवा वहिवाट चालविण्याची सनद मिळण्याविषयींच्या प्रत्येक अर्जीबरोबर, प्रोबेटाबाबद किंवा वहिवाट चालविण्याच्या सनदेबाबद या आक्टाअन्वयें ध्यावयाच्या फीइतकी रकम अमानत ठेविली पाहिजे.

(२) अर्जी मंजूर करण्यांत आल्यास, पोट-कलम (१) अन्वयें अमानत ठेवलेली रकम कोर्टाच्या हुकुमाअन्वयें, सदरीं सांगितल्याप्रमाणें ध्यावयाची फी दर्शविण्यासाठीं वापरावयाचा स्टांप विकत घेण्याकरितां खर्च केली पाहिजे.

(३) पोट-कलम (१) अन्वयें अमानत ठेवलेली जी कोणतीहि रकम पोट-कलम (२) अन्वयें खर्च करण्यांत आली नसेल ती अनामत ठेवणारास परत दिली पाहिजे."

---

## हेतु व कारणें यांचें निरूपण.

ज्या इस्टेटाच्या संबंधानें प्रोबेट किंवा वहिवाट चालविण्याची सनद देण्यांत आली असेल त्या इस्टेटाच्या अर्जदारानें आकारलेल्या किंमतीवर सन १८७० च्या ७ व्या आक्टाअन्वयें, कोर्टाच्या फीच्या द्वारें कांहीं नियमित शेंकडावण ध्यावयाची असते. तोच आक्ट सन १८७५ च्या १३ व्या व सन १८२० च्या ८ व्या आक्टांवरून सुधारला आहे त्याप्रमाणें त्याची वाब ३अ यांत असें ठरविलें आहे कीं, जेथें अर्जदारानें दिलेली फी फारच जास्त असल्याची ठरते तेथें ती जास्त असलेली परत द्यावी, आणि तशीच उलट पक्षीं, प्रोबेट किंवा वहिवाट चालविण्याची सनद मिळण्याविषयीं अर्जी करते वेळीं अर्जदारानें, आपल्या हातीं यावयाचा संभव असलेल्या ऐवजाचा फारच कमी अंदाज करून त्यावर आकारलेली फी दिली असेल तेव्हां, जी रकम त्यानें खरोखर भरली असेल तिच्या व जी त्यानें भरली पाहिजे होती तिच्या मधील तफावत पुढें वसूल करावी.

२. परंतु अर्जदारानें केलेला किंमतीचा आकार असावा तितका आहे किंवा नाहीं हें जेणेंकरून सरकारच्या मुलकी अमलदारांस पाहतां येईल असें कांहीं साधन योजलेलें नाहीं. यास्तव कायद्यांत व्यवहारिकदृष्ट्या जी कांहीं महत्वाची उणीव असल्याचें अनुभवावरून दिसून आलें आहे ती दूर करण्यासाठीं, जेणेंकरून जिल्ह्याच्या मुख्य मुलकी अमलदारास, प्रोबेट किंवा वहिवाट चालविण्याची सनद मिळण्याविषयीं अर्जी केलेल्या कोणत्याही प्रकरणाचे कागदपत्र पाहतां येतील व संबंध असलेल्या इस्टेटाची किंमत कमी आकारली आहे असें कोर्टांत शाबीत करतां येईल असें एक कलम सन १८७० च्या कोर्टाच्या फीच्या (सन १८७० च्या ७ व्या) आक्टांत दाखल करण्याचें या मसुद्यावरून योजिलें आहे.

३. शिवाय त्याच आक्टांत, प्रोबेट किंवा वहिवाट चालविण्याची सनद मिळण्याविषयीं अर्जी करते वेळीं, प्रोबेट किंवा सनद पुढें देण्यांत आल्यास त्या संबंधानें ध्यावयाची फी जेणेंकरून वसूल होईल असा, सन १८८९ च्या वारसासर्टिफिकेटाबाबदच्या (सन १८८९ च्या ७ व्या) आक्टाच्या १४ व्या कलमांतील ठरावासारखा, एक ठराव दाखल करण्याचें योजिलें आहे. हल्लीं अमलांत असलेल्या कायद्याप्रमाणें ह्मटलें ह्मणजे, जी ड्यूटी द्यावयाची ती प्रोबेट किंवा वहिवाट चालविण्याची सनद मिळण्याविषयींच्या अर्जीवर द्यावयाची नसून प्रोबेट किंवा वहिवाट चालविण्याची सनद देण्यांत आली ह्मणजे त्यावर द्यावयाची असते. ज्या मनुष्यास सन १८६५ चा हिंदुस्थानचा वारसाबाबद (सन १८६५ चा १० वा) आक्ट याचीं कलमें १८७ व १९० लागू नसून आपले वारसाचे हक्क शाबीत करण्यासाठीं प्रोबेट किंवा वहिवाट चालविण्याची सनद हजर करणें भाग नाहीं, त्याचे इच्छिलेले सर्व हेतु, मागितलेलें प्रोबेट किंवा वहिवाट चालविण्याची सनद प्रत्यक्ष न घेतां व त्याबदलची ठरविलेली फी न भरतां, प्रोबेट किंवा वहिवाट चालविण्याची सनद देण्याविषयीं आपल्या अर्जीवर त्यानें फक्त हुकुम मिळविला ह्मणजे तेवढ्यानेंच तडीस जाण्यास हरकत नाहीं. हें उघड आहे कीं असा परिणाम व्हावा असा उद्देश नसावा, व तसा परिणाम न व्हावा ह्मणून या मसुद्याच्या २ ऱ्या रकमेच्या शेवटच्या भागाची योजना केली आहे.

तारीख २६ माहे जून सन १८९७.

(सही) जे. वुडवर्न.

जे. एम म्याक्फर्सन,

सेक्रेटरी निसबत हिंदुस्थान सरकार.

(True translation)

M. A. BAIG,

Oriental Translator to Government.

PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.